अल्लाह शपथ! तुमच्यापैकी जो कुणी सत्या शीवाय गोळा करील, तो अल्लाह ला अशा परिस्थितीत भेटील की, त्याने त्या वस्तुंना उचललेलं असेल

अबु हुमैद साअदी रजिअल्लाहु अनहु वर्णन करतात की: प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही
व सल्लम नी कबिला अजद चा एक व्यक्ती लुतबीया ला बनी सुलेमची जकात च्या वसुली करता नियुक्त केले, जेव्हा तो वसुली करुन परतला तेव्हा म्हणाला:हा माल तुमचा [सार्वजनिक ]आहे, व ह्या माझ्या वैयक्तिक भेटवस्तु आहेत. त्यावर प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी फरमाविले:<>मग मेंम्बरवर उभे राहिले, व सर्वांना संबोधित
केले:अल्लाह ची स्तुती वर्णन केली, व तद्नंतर म्हणाले की:<> सरतेशेवटी प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी आपले हात उचलले, इथपर्यंत की त्यांच्या दोन्ही बगली चा पांढरेपणा झळकु लागला, त्यांनी फरमाविले:<> अबू हुमैद म्हणतात की ही गोष्ट माझ्या कानांनी ऐकली आणि माझ्या डोळ्यांनी पाहिली. [صحيح] [متفق عليه]

अबु हुमैद साअदी रजिअल्लाहु अनहु वर्णन करतात की प्रेषित मुहम्मद [सलामती असो त्यांच्यावर]नी बनु सलेम ची जकात वसुली करता ईब्ने लुतबीया नावाच्या माणसाला नियुक्त केले, जेव्हा तो व्यक्ती वसुली करुन परतला, तेव्हा प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी त्याला हिशेब मागीतला, तो व्यक्ती म्हणाला की: हा माल तुमचा आहे, व हे मला भेटरुपी वस्तु मिळाल्या आहेत. त्यावर प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी फरमाविले की: जर तुम्ही खरे आहात तर तुमच्या माय बापाच्या घरी बसले असते व बघले असते की तुम्हाला विना नियुक्ती चे कोण भेटवस्तु देतो बरं; ज्या हक्कांसाठी तू परिश्रम केलेस तेच तुला हे भेट देण्याचे कारण आहेत, आणि जर तू घरीच बसून राहिलास तर तुला काहीही भेट मिळाली नसती, त्यामुळे केवळ ती भेट म्हणून तुझ्याकडे आली आहे म्हणूनच ती स्वतःसाठी योग्य किंवा वैध समजणे योग्य नाही. मग प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लम रागाच्या भरात मेंम्बर वर चढले, अल्लाह ची स्तुतीगाण केली व लोकांना संबोधित केले: यानंतर तुमच्यापैकी मी कुण्या एकाला एका कार्यावर नियुक्त करतो, ज्याचा अधिकार मला साक्षात अल्लाह ने प्रदान केला आहे, मग तो व्यक्ती वसुली करुन परतल्यावर म्हणतो की: हा माल तुमचा आहे.व हे मला भेटवस्तु मिळाल्या आहेत! काय त्याने आपल्या माय बापाच्या घरी बसुन बघावं, की कोण त्याला आयत्या भेटवस्तु देतो, अल्लाह शपथ! तुमच्यापैकी जो कुणी नाहक मालकी नसतांना माल हडपेल तर तो कयामत च्या दिवसी अल्लाह समोर त्या नाहक मालाला आपल्या मानेवर उचलुन आणेल, मग ते उंट असेल तर तो उंट बोंबलत असेल, जर ते गाय असेल तर ती होंबारडा फोडत असेल, जर ति बकरी असेल तर ती बकरी ओरडत असेल. मग प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी आपले दोन्ही हात ईतके उंचावले की त्यांच्या बगलीची पांढुरकी दिसुन आली, त्यांनी फरमावीले की:हे अल्लाह मी तुझा संदेश पोहचविला. अबु हमीद रजिअल्लाहु अनहु सांगतात की:हे सर्व माझ्या डोळ्यांनी बघितलं व माझ्या कानानी ऐकलं.